**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६५/२०१९** **दिनांक १३/०८/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/०८/२०१९ ते १३/०८/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १४/०८/२०१९ सकाळी ८:३० पासून १८/०८/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/०८ | ०८/०८ | ०९/०८ | १०/०८ | ११/०८ | १२/०८ | १३/०८ | | १४/०८ | १५/०८ | १६/०८ | १७/०८ | १८/०८ |
| ६२.२ | ३७.२ | १८.४ | ३३.४ | १८.२ | ९.२ | ९.४ | पाऊस (मिमी) | ३४ | ३९ | २५ | २० | १८ |
| २८.४ | २८.० | २८.२ | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३१ | ३० | २९ | २९ | २९ |
| २४.२ | २५.४ | २५.५ | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २६ | २५ | २५ | २४ | २४ |
| ८ | ८ | ८ | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ७ | ८ | ७ | ३ | ४ |
| ९५ | ९३ | ८७ | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९३ | ९३ | ९३ | ९३ | ९३ |
| ९२ | ९० | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७९ | ८४ | ८३ | ८२ | ८१ |
| ६.८ | ६.३ | ७.७ | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | १३ | १५ | १२ | ७ |
| ई.पु. | ई | ई.पु. | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | नै.द. | द. | नै.द. | नै.प. | प. |
| | | | | | | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | | | | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा | | |
| १८८.० | | | | | | ३४७२.० | | | | ३५५८.३ | | |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १४ ते १८ ऑगस्ट, २०१९ पर्यंत मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून वाऱ्याचा वेगात ७ ते १५ कि.मी. पर्यंत वाढ संभवते.**

**दिनांक ९ ते १५ ऑगस्ट, २०१९ साठी कोकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **फुटवे अवस्था** | • पुढील पाच दिवस ढगाळ वातावरण असून पाउसाची उघडीप असण्याची शक्यता असल्यामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरे व सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे सातत्याने निरीक्षण करून किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष ठेवावे. खाचरातील पाणी जास्त काळ न साठवता २-३ दिवसांच्या अंतराने जुने पाणी बाहेर काढण्याची आणि नवीन पाणी खाचरात घेण्याची व्यवस्था करावी. पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही  मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे तसेच सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी शेतात पाणी बांधून पिकावरून एक जाड दोर आडवा धरून ओढत न्यावा त्यामुळे सुरळ्या पाण्यात पडतील. नंतर एक ते दोन तासांनी शेतातील पाणी एका बाजूला फोडून लावावे व सर्व सुरळ्या एका ठिकाणी जमा झाल्यावर नष्ट कराव्यात व त्यानंतर शेतात नवीन पाण्याची साठवण करण्याची व्यवस्था करावी.<br>**<u>टिप:</u>** पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी तसेच पाऊसामध्ये कीटकनाशकाचे द्रावण पानांवरून वाहून जावू नये म्हणून स्टिकर द्रावणात मिसळून फवारणी करावी.<br>• भात पिक पुर्नलागवडीनंतर एक महिन्याने गरजेनुसार बेणणी आणि खुरपणी करून भात पिकास फुटवे येण्याच्या अवस्थेत नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावा.<br>• भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी<br>• पुढील पाच दिवस ढगाळ वातावरण असून पाउसाची उघडीप असण्याची शक्यता असल्यामुळे पाणी साचून राहणाऱ्या भात खाचरात तसेच जेथे घट्ट लागवड असलेल्या क्षेत्रात तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. पिकाचे तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भावावर सातत्याने लक्ष ठेवावे. जर रोपाच्या चुडात ५ ते १० तुडतुडे आढळल्यास ॲसिफेट ७५ टक्के पाण्यात विरघळणारी भुकटी २.२५ ग्रॅम किंवा फिप्रोनिल ५ टक्के प्रवाही २ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ०.२ मि.ली प्रति लिटर पाण्यातून भात पिकावर फवारावे. तसेच खाचरात पाणी जास्त काळ न साठता फोडून लावावे व नवीन पाणी साठवण्याची व्यवस्था करावी.<br>**टिप :** फवारणी करताना कीटकनाशक चुडाच्या बुंध्यावर पडेल याची दक्षता घ्यावी |
| **नागली (नाचणी)** | **फुटवे अवस्था** | • नागली पिक पुर्नलागवडीनंतर एक महिन्याने गरजेनुसार बेणणी आणि खुरपणी करावी. बेणणी केल्यानंतर नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावा. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • १० वर्षावरील "हापूस" जातीच्या आंबा झाडास नियमित व लवकर फळे धरण्यासाठी कलमांच्या वाढीच्या विस्तारानुसार पॅक्लोब्युट्राझोल (कल्टार) हे वाढ निरोधक संजीवक देण्यात यावे. प्रत्येक झाडाचा पूर्व -पश्चिम व दक्षिण - उत्तर व्यास मोजून त्याची सरासरी काढून प्रति मीटर व्यासास ०.७५ ग्रॅम पॅक्लोब्युट्राझोल (३ मि.ली. कल्टार) दयावे. पॅक्लोब्युट्राझोलची आवश्यक मात्रा ३ ते ५ लिटर प्रती झाड पाण्यात मिसळून १० ते १२ सें.मी. खोल असे सम अंतरावर २५ ते ३० खड्डे मारून त्यात द्रावण समप्रमाणात ओतावे, नंतर खड्डे मातीने बुजवून टाकावेत. पॅक्लोब्युट्राझोल देण्यापूर्वी झाडाभोवती असलेले सर्व तण काढून टाकावे.<br>**टिप:** पाऊसाची तीव्रता कमी असताना पॅक्लोब्युट्राझोल दयावे. |

| | | |
|---|---|---|
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • काजूच्या ४ वर्षावरील प्रती कलमास ४० किलो शेणखत/हिरवळीचे खत, २ किलो युरिया, १.५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ५०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश खते कलमाच्या विस्ताराच्या थोडीशी आत बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. वर दिलेली खताची मात्रा चार वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी पाव पट, दुसऱ्या वर्षी अर्धा पट आणि तिसऱ्या वर्षी पाऊण पट या प्रमाणे देण्यात यावी.<br>**टिप:** पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत. |
| **नारळ** | **वाढीची अवस्था** | • नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना मातीची भर द्यावी तसेच बाग तणमुक्त ठेवावी<br>• नवीन लागवड केलेल्या रोपांवर कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी.<br>• जुन्या नारळ बागेत सुकलेल्या झावळ्या, वांझ पोयी, पालापाचोळा गोळा करून बागेत स्वच्छता करावी तसेच अति पाऊसामुळे कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता लक्षात घेता बागेचे निरीक्षण करून प्रादुर्भाव आढळ्यास  शेंड्याकडील भागावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| **सुपारी** | **वाढीची अवस्था** | • सुपारीच्या ३ वर्षावरील प्रती झाडास १० किलो शेणखत, १२ किलो हिरवळीचे खत, १६० ग्रॅम युरिया, ५०० ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश खते झाडाच्या बुंध्या पासून १ मीटर अंतरावर बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. वर दिलेली खताची मात्रा तीन वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/३ पट आणि दुसऱ्या वर्षी २/३ पट या प्रमाणे देण्यात यावी.<br>• सुपारी तडकण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी शिफारस केलेल्या खतांबरोबर ६०० ग्रॅम सूक्ष्म अन्नद्रव्ये (बोरोन ६० ग्रॅम, झिंक ३०० ग्रॅम, मगनीज ६० ग्रॅम, लोह १२० ग्रॅम आणि कॉपर ३० ग्रॅम) पहिल्या हप्त्यात जमिनीतून देण्यात यावी.<br>**टिप:** पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत. |
| **भाजीपाला पिके** | **वाढीची अवस्था** | • वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाली असल्यास फळमाशीच्या नियंत्रणासाठी 'मिथाईल युजेनोल' किंवा 'क्यु-लुअर' रक्षक सापळे भाजीपाला क्षेत्रामध्ये जमिनीपासून १ ते २ फूट उंचीवर प्रति हेक्टरी ४ लावावेत. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**